नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१९
माणिकलाल वि. शालीकराम
निशाणी क्र. २० खाली

**प्रतिवादीतर्फे उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**
**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. महाजन यांच्यामार्फत :-**

१५. हे म्हणणे खरे आहे की, शेतसर्वे नं. १०२ चा शालीकराम यांनी आणि सर्वे नं. २४६ चा आनंदाराव यांनी विकास केला. हे मला माहित नाही की, त्याकरीता शालीकराम व आनंदाराव यांनी कर्ज घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उतारा नि.क्र. ३६ यावर आनंदराव यांनी आणि ७/१२ उतारा नि.क्र. ३९ यावर शालीकराम यांनी कर्ज घेतल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर्जाबाबत मी कधीही तक्रार केली नाही.

१६. हे मला माहित नाही की, दि. १५/११/२०१९ मध्ये शालीकराम व त्यांच्या बहिणी शेतसर्वे क्र. १०० आणि १०१ वर असतांना झनकलाल व पंकज वरखडे हे त्यांना कुऱ्हाड मारायला धावले व त्यांना जिवाने मारण्याची धमकी दिली होती. हे मला माहित नाही की, शेतात काम करणाऱ्या बाया व सर्व लोक तेथून घाबरून निघून गेले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर जेव्हापण माझ्या बहिणी सर्वे नं. १०० आणि १०१ मध्ये काम करायला गेल्या तेव्हा मी त्यांना हरकत अडथळा करायला सुरूवात केली. हे म्हणणे खरे आहे की, दि. २५/११/२०१९ रोजी सदर शेतामध्ये ३ पोलीस आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या बहिणी सर्वे क्र. १००, १०१ व १९९ मध्ये काम करत होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी प्रतिवादी व त्यांच्या बहिणींना लेखी जबाब अनुच्छेद १९ मध्ये नमुद असलेली शिवीगाळ केली.

१७. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी माझ्याविरुद्ध दिवाणी

दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी नवसुबाई, कौसला आणि सरस्वती यांनी माझ्याविरुद्ध दिवाणी दावा नं. ३१/२०२० दाखल केलेला आहे व त्याची तारीख देखील आजच आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला विचारपूस करून विक्रीपत्र बनवले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा क्र. ३१/२०२० दाखल करण्यापूर्वी त्यातील वादींनी मला नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीसमध्ये त्यांनी सर्वे क्र. १००, १०१, १९९ व २३३ यामध्ये त्यांचा १/८ वाटा असल्याबाबत नमुद आहे.

१८. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई–वडील केवळ शालीकराम आणि आनंदराव यांच्याकडे राहत होते. ते माझ्याकडे राहत असल्याबाबत मी कोणताही दस्तऐवज दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पाचेबाई भलावी देखील आनंदराव आणि शालीकराम यांच्याकडे राहत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे आई–वडील आणि पाचेबाई यांची केवळ आनंदराव आणि शालीकराम यांनी सेवा केली होती.

**मध्यंतराची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब**.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

सही/–

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २१/०१/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक

नियमीत दिवाणी दावा क्र. ३९/२०१९
माणिकलाल वि. शालीकराम
निशाणी क्र. २० खाली

**प्रतिवादीतर्फे उलटतपास शपथेवर पुन्हा सुरु**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. महाजन यांच्यामार्फत :-**

१९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणी प्रतिवादी नवसुबाई, कौसला, सरस्वती आणि रामरती यांना मी माझ्या घरी येऊ देत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहिणी सदर दाव्यामध्ये माझ्या विरुद्ध प्रतिवादी म्हणून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १००, १०१, १९९ व २३३ यामध्ये माझा १/८ वाटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वयात आल्यानंतर प्रतिवादी क्र. १ व २ यांच्याकडे पहिल्यांदा शेतीच्या वाटणीची मागणी केली होती. मी पहिल्यांदा केव्हा वाटणीची मागणी केली हे मला आठवत नाही. मी वाटणीची मागणी कधीही केली नाही.

२०. माझ्या सरतपासाच्या अनुच्छेद क्र. ५ मध्ये प्रतिवादी क्र. १ व २ हे सर्वे क्र. १०२ व २४६ या संदर्भात तृतीय पक्षाचे स्वारस्य करण्याच्या प्रयत्नात आहेत, असे नमुद आहे परंतु त्या संदर्भात कोणताही दस्तऐवज मी अभिलेखावर लावलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, तृतीय पक्षाचे स्वारस्य करण्याच्या प्रयत्नात करत आहेत, असे खोटे कारण देऊन मी सदरचा दावा पुढे आणलेला आहे. हे मला माहित नाही की, मृत्युपत्राबाबत माझ्या बहिणींना माहिती होती किंवा नाही. माझे नाव सर्व वादमिळकतीच्या ७/१२ ला कोणी व कधी आणले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मृत्युपत्र रद्द व्हावे अशी केस मी दाखल केलेली नाही. हे मला माहित नाही की, मृत्युपत्र चुकीचे

असल्याचे कोणत्या न्यायालयाने जाहीर केले आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

सही/-

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)

दिनांक : २१/०१/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक